सकाळ

# कृषी जीवनगौरव पुरस्कारासाठी योग्य निवड : दळवी

## बाळासाहेब वाघ यांना पुरस्कार प्रदान

**सकाळ वृत्तसेवा**



पुणे : कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेचे संस्थापक बाळासाहेब वाघ यांना कृषी जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करताना निवृत्त सनदी अधिकारी चंद्रकांत दळवी.

पंचवटी, ता. ५ : सध्या समाजात कृषी, शैक्षणिक आणि सामाजिक या तिन्ही क्षेत्रांत उल्लेखनीय आणि दखलपात्र काम करणारी फार मोजकी माणसं सापडतील. या मोजक्या माणसांमध्ये बाळासाहेब वाघ यांचं नाव आवर्जून येतं. कारण पाच दशकांपासून बाळासाहेब वाघ यांनी कृषी, शैक्षणिक आणि सामाजिक अशा क्षेत्रांत विविध भूमिकांवर काम करत, आपला ठसा उमटविला आहे. माजी विद्यार्थी संघटनेने कृषी जीवनगौरव पुरस्कारासाठी बाळासाहेब वाघ या योग्य आणि कर्तृत्ववान व्यक्तीची निवड केली असल्याचे प्रतिपादन पुणे महापालिकेचे माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी केले.

माजी विद्यार्थी संघटनेच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कृषी जीवनगौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यंदाचा कृषी जीवनगौरव पुरस्कार के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांना देण्यात आला. मानाची पुणेरी पगडी, सन्मानचिन्ह आणि मानपत्र, असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुणे महापालिकेचे माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कृषी महाविद्यालयाच्या डॉ. शिरनामे सभागृह येथे सोहळा झाला. व्यासपीठावर माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष आणि आमदार ॲड. अशोकराव पवार, कार्यकारी अध्यक्ष डॉ. बी. के. जगताप, सचिव प्रा. डॉ. जनार्दन कदम, डॉ. डी. जी. हापसे आणि माजी विद्यार्थी, शास्त्रज्ञ, अधिकारी आदी उपस्थित होते.

श्री. वाघ म्हणाले, की आधुनिक काळात कृषी महाविद्यालयांनी आपल्या अभ्यासक्रमात नवीन बदल करावेत. भारतापेक्षा इस्राइल, चीन, पाकिस्तान हे देश शेती क्षेत्रात नवनवीन संशोधन करत आहेत. भारत कमी पडत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. सरकारने कृषी महाविद्यालयांची संख्या वाढविली पाहिजे, त्यासाठी शासनदरबारी प्रश्न मांडणार असल्याचेही त्यांनी सांगितले. कृषी जीवनगौरव पुरस्काराने जोमाने काम करण्याची ऊर्जा निर्माण झाली असल्याचेही ते म्हणाले.

डॉ. बी. के. जगताप यांनी प्रास्ताविक केले. पल्लवी सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. जनार्दन कदम यांनी आभार मानले.

Nashik, Main
06/02/2020 Page No. 3